WK 25 (171-194) 20

# उधळण

झाली पानगळीला सुरुवात
आला नव्या पालवीला बहर
अवनीच्या आनंदाला येई मग उधाण
करी मुक्तहस्ताने रंगाची उधळण ||

शीत लहरी अपुल्याच तालात
करी नर्तन हलक्या पद-रवाने
आंब्यासही येई मोहर
करी कोकीळ कुजन मधुरतेने ||

पळस, गुलमोहर, बहावा बहरुनी येई
करी परिसर आल्हाददायी
वेडावून टाकती जीवाला
देती नयनरम्य सुख मनाला ||



सौ. अस्मिता श्री. बालेकर
वंदेमातरम्, नवाथेनगर,
अमरावती.